# ‘मेट्रो ३’च्या भुयारीकरणाचा ३५वा टप्पा पूर्ण

**लोकसत्ता खास प्रतिनिधी**



**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ मेट्रोच्या भुयारीकरणाचा ३५ वा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. यामुळे पॅकेज चारमधील १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले. संपूर्ण मार्गिकेवरील एकूण भुयारीकरणापैकी अजून सहा टप्पे बाकी आहेत.

‘मेट्रो ३’च्या पॅकेज ४ मध्ये दादर, सिद्धिविनायक, शीतलादेवी या स्थानकांचा समावेश असून येथे आठ भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले. सिद्धिविनायक ते दादर हा १.१२ किलोमीटरचा ३५ वा भुयारीकरणा टप्पा बुधवारी पूर्ण झाला. त्यामुळे पॅकेज ४ चे एकूण १०.९६ किमी लांबीचे भुयारीकरण पूर्ण झाले.

‘एकूण सातपैकी चार पॅकेजेसमध्ये १०० टक्के भुयारीकरण पूर्ण झाले असून ही अत्यंत आनंदाची बाब आहे. विशेषतः पॅकेज ४ मध्ये भुयारीकरण करणे एक आव्हानात्मक काम होते. या पॅकेजमधील सर्व विकासकामे रस्त्यावरील वाहतूक, धार्मिक स्थळांच्या जवळपास आहेत. शहराचे मुख्य केंद्र मानले जाणारे दादर, हे मेट्रो ३ द्वारे जोडले जाईल व मुंबईकरांच्या अडचणी कमी होतील’, असे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनचे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी सांगितले.

हेरेन्कटनेट कंपनीद्वारे बनलेले व अर्थ प्रेशर बॅलेन्स (ई.पी.बी) तंत्रज्ञानाचा समावेश असलेल्या टनेल बोरिंग मशीन (टीबीएम) कृष्णा १ द्वारे हे भुयारीकरण करण्यात आले. यावर्षी ७ जुलैला या टप्प्याचे काम सुरू झाले. यामध्ये ८०५ रिंग्सचा वापर करून भुयारीकरण करण्यात आले. तसेच दादर मेट्रो स्थानकाचे जवळपास ४२ टक्के काम पूर्ण झाल्याची माहिती एमएमआरसीएलचे प्रकल्प संचालक, एस. के. गुप्ता यांनी दिली.